# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 17 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- गहू आणि हरभऱ्यासह सहा मुख्य रबी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
- सत्ताधारी महायुतीकडून आपल्या कामकाजाचं प्रगती पुस्तक जाहीर–विकासाचे सर्व दावे खोटे असल्याची काँग्रेसची टीका
- विधानसभा निवडणुकीसाठी राज्यभर निवडणूक यंत्रणा सज्ज

आणि

- वंचित बहुजन आघाडीचा आरक्षण उपवर्गीकरण समितीला विरोध, निवडणुकीसाठी उमेदवारांची तिसरी यादी जाहीर

****

आगामी पणन हंगामासाठी सहा मुख्य रबी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्याला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मोहरीच्या दरात सर्वाधिक म्हणजे ३०० रुपये प्रति क्विंटल इतकी वाढ करण्यात आली असून, मसूर २७५ रुपये प्रति क्विंटल, हरभरा २१०, गहू १५०, करडई १४० तर जवाच्या दरात १३० रुपये प्रति क्विंटलची वाढ करण्यात आली आहे. या वाढीनंतर गव्हाची किमान आधारभूत किंमत दोन हजार ४२५ रुपये, जव - एक हजार ९८० रुपये, हरभरा - पाच हजार ६५० रुपये, मसूर –सहा हजार ७००, मोहरी - पाच हजार ९५० रुपये आणि करडई पाच हजार ९४० रुपये प्रति क्विंटल अशी झाली आहे.

केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्यालाही केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सत्ताधारी महायुतीनं आपल्या कामांचा आढावा घेणारं प्रगती पुस्तक काल प्रकाशित केलं. महाविकास आघाडीनं आपल्या कार्यकाळात अनेक प्रकल्पांमध्ये अडथळे आणले, पण, महायुतीचं सरकार आल्यानंतर राज्यात विकासाला गती मिळाली, असं प्रतिपादन मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं. उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार, रिपाईचे अध्यक्ष तथा केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी राज्य सरकारच्या दोन वर्षांचा कामांचा लेखाजोखा मुख्यमंत्र्यांनी मांडला.

****

दरम्यान, शिंदे यांनी केलेले विकासाचे सर्व दावे खोटे आणि बनावटी असल्याची टीका, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. २०१९ मध्ये उद्धवलेल्या कोविड महामारीच्या काळात महाविकास आघाडी सरकारने केलेल्या कामाची दखल देशानेच नाही तर जगाने घेतल्याचं, पटोले यांनी सांगितलं. महाविकास आघाडीत २८८ पैकी २२४ जागांवर सहमती झाल्याची माहिती त्यांनी दिली.

****

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं राज्याच्या प्रशासकीय यंत्रणाही सज्ज झाल्या असून, पारदर्शक पद्धतीनं निवडणुका पार पडाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आयकर विभागही तयार असून, रोख रकमेचं वाटप, पैशाची देवाणघेवाण अशा बाबी दिसून आल्या तर नागरिकांनी १८००-२३३-०३५६ या नि:शुल्क क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन या विभागानं केलं आहे.

****

राजकीय पक्ष किंवा इच्छुक उमेदवारांकडून दिवाळीच्या काळात वाटप होणाऱ्या भेटवस्तूंवर निवडणूक आयोगाचं काटेकोर लक्ष राहणार आहे. अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यासंदर्भात सर्वसामान्य नागरिक C-VIGIL ॲपवर तक्रार नोंदवू शकतात. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर काही शासन आदेश जारी झाले असतील किंवा काही जाहिराती प्रसिद्ध झाल्या असतील त्यांची चौकशी करू असंही कुलकर्णी यांनी सांगितलं.

या निवडणुकीत उमेदवाराला कमाल ४० लाख रुपये खर्च करता येईल. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर खर्चाची मोजणी सुरू होईल, मात्र अर्ज भरण्यापूर्वी काही प्रचारसाहित्य खरेदी केलं असेल, तर त्याचा खर्चही यात धरला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा राज्यात मतदारांची संख्या ६९ लाखांहून अधिक झाल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३१ लाख ७६ लाख मतदार, तीन हजार २७३ मतदान केंद्रांवर मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी काल याबाबतच्या बैठकीत ही माहिती दिली. जिल्ह्यातल्या सर्व नऊ विधानसभा मतदार संघात होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेसाठी, १५ हजाराहून अधिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून, शहर आणि ग्रामीण पोलिस, होमगार्ड, केंद्रीय आणि राज्य राखीव पोलिस दलाच्या आठ कंपन्या सज्ज असल्याचं जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितलं. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके यांनी प्रशासनाच्या तयारीचा आढावा दृक श्राव्य माध्यमातून सादर केला....

> ***''आपल्या जिल्ह्यामध्ये एकूण मतदान केंद्रांची संख्या ही ३२७१ इतकी आहे. आपल्या जिल्ह्यामध्ये १६ प्रकारच्या विविध विषयांचे नोडल अधिकारी आपण नियुक्त केलेले आहेत. आपल्या सर्व ९ विधानसभा मतदारसंघांमध्ये मॉडेल मतदान केंद्र उभारणी करण्या संदर्भात कारवाई केली जाईल प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमध्ये एक मॉडेल पोलिंग  स्टेशन असेल १९५० हा टोल फ्री क्रमांक असेल जो कुठल्याही मतदाराला निवडणूकीच्या अनुषंगाने कुठली तक्रार करायची असेल किंवा माहिती मिळवायची असेल तर १९५० या क्रमांकावर डायल करून माहिती उपलब्ध करू शकता किंवा तक्रार नोंदवू शकता.''***

महानगरपालिका हद्दीत असलेल्या तीन विधानसभा मतदारसंघात आचारसंहिता अंमलबजावणी, मतदार जनजागृती, मतदान केंद्रावरच्या सुविधा याबाबत मनपा प्रशासन सक्रियतेनं काम करत असून, आयोगानं दिलेल्या निर्देशांचं तंतोतंत पालन केलं जाईल, असं मनपा आयुक्त जी.श्रीकांत यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्ह्यातल्या जिंतूर, परभणी, गंगाखेड आणि पाथरी या चारही मतदारसंघात मिळून एकूण १५ लाख ४४ हजार ४५१ मतदार आहेत. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

लातूरच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी काल राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक घेतली. आदर्श आचारसंहिता राज्यात लागू झाली असून, याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचं सर्वांनी पालन करावं, असं आवाहन त्यांनी केलं. जिल्हा निवडणूक यंत्रणेमार्फत स्थिर निगराणी पथकं आणि भरारी पथकं स्थापन केल्याचं त्यांनी सांगितलं.

****

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं पुढचे चाळीस दिवस सर्व अधिकाऱ्यांनी चोवीस तास सतर्क राहण्याचे निर्देश नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी दिले आहेत. काल झालेल्या निवडणूक तयारीच्या नियोजन बैठकीत ते बोलत होते.

****

बीड जिल्ह्यात सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण २१ लाख ९७ हजार ८३० मतदारांसाठी दोन हजार चारशे सोळा मतदान केंद्रं उभारण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जिल्ह्यात मोर्चा, निदर्शनं, आंदोलनं आणि घोषणांवर निर्बंध घालण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा 'रणांगण विधानसभेचं' हा कार्यक्रम आजपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube चॅनल्सवरुन हा कार्यक्रम आपण ऐकू शकाल. आज या कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने क्रिमीलेअर आणि आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी एक अध्यादेश काढत, त्याच्या अंमलबजावणीसाठी निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. वंचित बहुजन

आघाडीने या समितीला विरोध दर्शवला आहे. आघाडीचे अध्यक्ष विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही भूमिका मांडली. राज्य सरकारने काढलेला हा अध्यादेश महाविकास आघाडीतल्या घटक पक्षाच्या संमतीने काढल्याची टीकाही आंबेडकर यांनी केली.

****

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीसाठी ३० उमेदवारांची तिसरी यादी काल जाहीर केली. यामध्ये किनवट मतदारसंघातून विजय खुपसे, नांदेड उत्तर – गौतम दुथडे, देगलूर– सुशीलकामार देगलूरकर, पाथ्री – विठ्ठल तळेकर, परतूर आष्टी – रामप्रसाद थोरात, घनसावंगी – कावेरी खटके, जालना – डेविड धुमारे, बदनापूर – सतिश खरात, माजलगाव – शेख मंजूर चांद, लातूर शहर – विनोद खटके, तुळजापूर – स्नेहा सोनकाटे, उस्मानाबाद – प्रणित डिकले, तर परंडा मतदारसंघातून प्रविण रणबागुल यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

प्रसिद्ध कवी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातले, मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. दासू वैद्य यांची राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सदस्यपदी निवड झाली आहे. आपल्या प्रदेशातल्या लेखकासंदर्भात किंवा उपक्रमासंदर्भात काही वेगळे प्रयत्न करण्याचा आपला प्रयत्न असेल, अशी भावना दासू वैद्य यांनी आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केली....

> ***मराठी साहित्य संस्कृतीत काम करण्याची संधी मला जी मिळाली आहे, सदानंद मोरे हे साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आहेत, त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला काम करायला मिळेल, याचा आनंद आहे. समाधान आहे. आपल्या प्रदेशातल्या लेखकासंदर्भात किंवा उपक्रमासंदर्भात काही वेगळे प्रयत्न यानिमित्तानं करता येतील का याचा मी प्रयत्न करेन.***

****

तुळजापूर इथल्या तुळजाभवानी मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ सातारा गादीच्या महाराणी दमयंतीराजे भोसले यांच्या हस्ते काल करण्यात आला. जीर्णोद्धराचे काम झाल्यानंतर तीर्थक्षेत्राचा दर्जा आणि भाविकांच्या सोयी–सुविधांमध्ये गुणात्मक वाढ होणार असल्याचं स्थानिक लोकप्रतिनिधींनी सांगितलं.

दरम्यान, कोजागिरी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी पायी येत असतात. त्यामुळे आज तुळजापूर मार्गावरील वाहतुक वळवण्यात आली आहे. सर्व मार्गांवर वाहतुकीसंदर्भात दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत.

****

भारत आणि न्यूझीलंडदरम्यान तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत काल पहिल्या कसोटीचा पहिला दिवस पावसामुळे वाया गेला. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी मैदानावर नियोजित या सामन्यात काल नाणेफेकही होऊ शकलं नाही. आज वातावरण अनुकूल राहिल्यास, सामना नियोजित वेळेच्या १५ मिनिटं आधी सुरू होईल.

****

नांदेड विभागात येत्या २० तारखेपर्यंत तारुर ते रोटेगाव आणि परभणी ते पिंगली या स्थानकांदरम्यान लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे नगरसोल – रोटेगाव – नगरसोल ही रेल्वे गाडी आजपासून १९ ऑक्टोबर पर्यंत नगरसोल ते रोटेगाव स्थानकांदरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. अमृतसर – नांदेड, काचीगुडा – नगरसोल, तसंच परळी – अकोला या गाड्या काही स्थानकांदरम्यान उशीरा धावणार असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड कार्यालयानं कळवलं आहे.

****